# दिनांक ०१/०८/२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा. आयुक्त यांचे कक्षा लगतच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये दिनांक ०१/०८/२०२५ रोजी स. ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

1. मा.आयुक्त, महानगरपालिका, अमरावती
2. मा. अति. आयुक्त (2), महानगरपालिका, अमरावती
3. सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. 1 महानगरपालिका, अमरावती
4. सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. 2 महानगरपालिका, अमरावती
5. सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. 3महानगरपालिका, अमरावती
6. सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. 4 महानगरपालिका, अमरावती
7. सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. 5 महानगरपालिका, अमरावती
8. मा.सहा.संचालक नगर रचना अधिकारी, महानगरपालिका,अमरावती.
9. श्री.मधुकर घारड, वृक्ष तज्ञ वनराई, अमरावती.
10. श्री.अनिल घोम, विद्यापीठ , अमरावती.
11. श्री.विलास देशमुख, वृक्ष तज्ञ, अमरावती.
12. उद्यान अधिक्षक, महानगरपालिका, अमरावती

- मा.आयुक्त तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण – मागील सभेत झालेल्या निर्णयानुसार संबंधीत झोन निहाय अनुपालन झालेले आहे का याबाबत अहवाल देण्यात यावा.
- सहा.आयुक्त झोन क्र.4 – पेज क्र.16 अ.क्र.9 मध्ये सागवान झाडे 2 वृक्ष आलेली आहे ती 1 वृक्ष काढण्यात यावे अशी दुरुस्ती घेण्यात येत आहे.
- सहा.आयुक्त झोन क्र.3 – पेज क्र.7 अ.क्र.7 मध्ये गुलमोहरचे 9 झाडे आलेली आहे ती 1 करण्यात यावे अशी दुरुस्ती घेण्यात येत आहे.
- श्री. मधुकर घारड, वृक्ष तज्ञ, वनराई अमरावती – कार्यपुर्ती अहवालामध्ये फांद्या/वृक्ष काढण्याची परवानगी दिली किती नाकारली यासंदर्भात संबंधीतांशी काय पत्रव्यवहार झालेला आहे. मा.आयुक्त तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण – विषयाचे अनुषंगाने एक्सल सिट तयार करण्यात येवुन पत्रव्यवहारामध्ये काय कारवाई झालेली आहे ते अद्यावत करण्यात यावे.
- श्री.विलास देशमुख ,वृक्ष तज्ञ, अमरावती – सभेचे निर्णयानुसार काम झालेले आहे किंवा नाही याबाबत काहीही बोध होत नाही. मा.आयुक्त तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण – सभेमध्ये परवानगी दिल्यानंतर अर्जदाराने झाड कापले किंवा मनपामार्फत कारवाई करण्यात आली हे दिसुन येत नाही.तसेच नविन बांधकाम करीत असेल तर ते स्वतः झाडे कापतात. नागरीकांनी तक्रार केल्यानंतर त्यावर कारवाई करणार काय ?. एक्सल सिट झोन निहाय करण्यात यावी. त्यामध्ये मागील सभेची व आज झालेल्या सभेची एक्सल सिट तयार करण्यात येवुन त्यामध्ये फायनल काय कारवाई झालेली आहे ते 3 कॅटगिरीमध्ये झोन निहाय नमुद करण्यात यावे. किती इंच जाडीचा फांदया कापणार आहे व किती

इंच जाडीचा कापण्याबाबत तांत्रिक सदस्याचे अहवालामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे याबाबत अति.आयुक्त यांनी याबाबतची पाहणी करावी. वृक्षाच्या फांद्या/वृक्ष काढणे संदर्भातील परवानगी बाबत प्रेस नोट तयार करुन पेपरमध्ये तशा प्रकारची प्रसिध्दी देण्यात यावी.

- पुढील वृक्ष प्राधिकरण सभेमध्ये तांत्रिक सदस्यांचा / वृक्ष अधिकारी यांचा GPS फोटोसह पाहणी अहवाल PPT सह उद्यान विभागाकडे मिटिंग अगोदर वृक्ष अधिकारी यांनी सादर करावा.

## झोन क्र.१

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | अध्यक्ष/सचिव राजमंगल गृहनिर्माण सहकारी संस्था, म.र.नं. ३६५ टॉवर लाईन रोड, अमरावती. | विविध प्रजातीचे | ०६ | दि.१७/०७/२०२५ रोजी पाहणी केली. त्याप्रमाणे अर्जदार गृहनिर्माण संस्थेने रस्त्याचे कडेला छान झाडे लावलेली आहेत. त्यापैकी ०६ विविध प्रकारच्या वृक्षाच्या फांद्या विद्युत तारेकडे झुकलेल्या दिसुन आल्या. २-३ इंच व्यासाच्या फांद्या मनपा उद्यान विभागाच्या सहाय्याने काढण्यास हरकत नाही, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबव निर्णयार्थ सादर. | स्पॉटवर गेल्यानंतर जास्त जाडीच्या मोठ्या फांदया कापण्याकरीता अर्जदार सांगतात. अहवालामध्ये जेवढे दिलेले आहे तेवढयाच फांदया कापण्यात याव्या. | **वृक्षाच्या २ ते ३ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २. | श्री. नंदकिशोर पुरुषोत्तम ताठे, तंत्रविहार कॉलनी, रहाटगांव, अमरावती | सागवान | ०१ | दि.३१/०७/२०२५ रोजी मा. तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता साग वृक्ष अर्जदाराचे स्वतःच्या राहत्या घराच्या परिसरात छान वाढलेली (३० इंच गर्थ/घेरा) आहे. वृक्ष परिपक्क असल्याने वृक्ष प्राधिकरणाचे साग विषयक धोरणाधिन राहून वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | सागवान धोरणाच्या अधिन राहून वृक्ष काढण्यास हरकत नाही. | **नियमानुसार १:१ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३. | श्री. जगतराव दयाराम टाले, महात्मा फुले कॉलनी राठी नगर, अमरावती | सागवान | ०२ | दि.३१/०७/२०२५ रोजी मा. तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता ०३ सागवान वृक्ष अर्जदाराचे घराचे समोर सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेली व हिरवीगार आहेत. साग वृक्ष सार्वजनिक जागेवर असल्याने अर्जदारास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात येत नाही. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी, वृक्षाला इजा पोहचवू नये असे सुचीत करण्यात यावे, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर.. | सागवान वृक्ष अर्जदाराचे घराचे समोर सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेली व हिरवेगार आहेत. | **सदर वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ४. | श्री. संदीप ना. नावंदर, अंबापेठ, अमरावती | आडजात | ०१ | दि.१५/०५/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता एक आडजात वृक्ष विनापरवानगी छाटल्याचे निदर्शनास आले. करीता संबंधीत अर्जदारास विनापरवानगी वृक्ष तोडणेबाबत नोटीस देण्यात आली, | सहा.आयुक्त – 20 हजार रु.दंड आकारण्याबाबत नोटीस दिलेली आहे. | **दंडामध्ये सवलत देण्यात येवु नये. सदर दंडाची रक्कम कायम ठेवण्यात यावी.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | त्या अनुषंगाने अर्जदार यांनी खुलासा सादर केला आहे. योग्य निर्णयार्थ सादर. | | |
| ५. | श्री. गणेश दादाराव अनासाने, दहीसाथ चौक, भाजीबाजार | विविध प्रजाती | १०/१२ | वृक्ष प्राधिकरण सभा दि. १३/०५/२०२५ ठराव क्र. १० अन्वये सदर प्रस्ताव मांडण्यात आला होता. सभेमध्ये अर्जदारास १,००,०००/- रू. दंड सर्वानुमते मंजुर करण्यात आला आहे. सबब निर्णयार्थ | 5 झाड विना परवानगीने तोडलेले आहे. | **सदर रक्कम कंत्राटदाराचे देयकामधुन कपात करण्यात यावे.** |

# झोन क्र.२

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मा.मुख्याध्यापक प्रगती उच्च प्राथमिक शाळा हमालपुरा गांधी नगर अमरावती. | गुलमोहर<br>अंजन<br>भिंगरी वृक्षाच्या फांद्या | १<br>१<br>१ | दिनांक २४/०७/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. शाळेच्या आवारात असलेल्या गुलमोहर वृक्ष,अंजन वृक्ष,भिंगरी वृक्षाच्या ३०-४० से.मी पर्यंत जाडीच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही .फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात. उचित निर्णयास सादर. | शाळेच्या आवारात असलेल्या गुलमोहर वृक्ष,अंजन वृक्ष,भिंगरी वृक्षाच्या ३०- ४० से.मी पर्यंत जाडीच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात हरकत नाही . | **वृक्षाच्या ३०-४० से.मी पर्यंत जाडीच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | सौ.उषा अरविंद लोंदे व इतर नागरिक रा.नरहरी नगर राजापेठ अमरावती | भिंगरी वृक्ष | १ | दि.११/०६/२०२५ रोजी वृक्ष प्राधिकरण सभा क्र.७ नुसार वृक्षाच्या फांद्या तोडण्याची परवानगी उद्यान विभाग यांना कार्यवाही करिता देण्यात आली आहे.<br>पुन्हा दि.३०/०७/२०२५ रोजी अर्जदार यांचा अर्ज व मेघल पोतदार - स्थापत्य अभियंता यांचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.नरहरी नगर टापर होस्टेल मागे राजापेठ येथील श्रीमती उषा अरविंद लोंदे व इतर रहिवासी यांचे घरासमोरील मुख्य रस्त्यालगत प्रचंड मोठे पिवळा गुलमोहर (**Peltraform**) चे झाड असून त्याची मुळे हि त्यांचे इमारतीच्या आत जमिनी खालून गेली आहेत घराच्या मागे असलेल्या विहिरीपर्यंत पसरलेली आहेत .विद्यमान इमारती ह्या लोड बेअरिंग (**Load Bearing**) ची असून जी -१(**G - 1)** पद्धतीच्या आहेत व अंदाजे ३० ते ४० वर्षे जुन्या आहेत व येथे ६ ते ७ कुटुंब राहत आहेत .झाडाच्या मुळां मुळे इमारतीच्या पायथ्यास (**Foundation**) ला धोका निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे .एकून परिस्थिती लक्षात घेता घरासमोरील मुख्य रस्त्यावरील पिवळया गुलमोहरचे झाड संपूर्णपणे काढून | विषयांकित स्थळ निरीक्षण करण्यात यावे. | **सादर करण्यात आलेले अर्जदाराची मागणी नामंजुर करण्यात येत आहे.**<br><br>**विषयांकित ठिकाणी फेर स्थळ निरीक्षण करण्यात यावे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | टाकण्याची शिफारस करण्यात येत आहे .यानुसार संबंधित अभियंता व मा.तांत्रिक सदस्य यांचा अहवाल प्राप्त करून घ्यावा लागेल .त्यानंतर वृक्ष काढण्याबाबत निर्णय घेता येईल यानुसार पुढील सभेमध्ये प्रकरण ठेवण्यात येईल .उचित निर्णयास सादर . | | |

## झोन क्र.३

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. अंकुश बेलगुंदे | कडूनिंब | ५ | दि.२७/०७/२०२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. सदर जागा सार्वजनीक वापराची मनपाची आहे. मनपाने सदर जागा अर्जदार यांना व्यायाम शाळेकरीता लीज वर दिली आहे. व सदर जागेपैकी १०% जागेवर व्यायामशाळा बांधण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे बांधकामाच्या जागेचे लेआऊट आखल्यानंतर, बांधकाम मंजुरी व बांधकाम नकाशा सादर केल्यानंतर प्रत्यक्ष किती झाडे बांधकामात येतात ते पाहुन वृक्ष तोडण्याची परवानगी देता येईल. तुर्त वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **सदर वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| २ | पोलीस निरिक्षक कल्याण शाखा ग्रामीण पोलीस अमरावती | | ६ | दि.२७/०७/२०२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. पोलीस कल्याण शाखा येथे भरपूर वृक्ष आहे. त्यापैकी ६ वृक्षाच्या फांद्या कडूनिंब व इतर वृक्षांच्या फांद्या मुळे विद्युत तारा व अंतर्गत रहदारीचा रस्ता झाकल्या गेला आहे. करिता ६ वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या चहुबाजूने छाटण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच १ वृक्ष पूर्णपणे वाळलेला आहे. तो वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | फांदया तोडण्याची परवानगी देण्यात यावी. | **वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.तसेच वाळलेला एक वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात यावी.** |
| 3 | श्रीमती पूनम प्रणय ढोक रा. न्यू प्रभात कॉलोनी अम. | पिंपळ | १ | दि.२७/०७/२०२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. सदर पिंपळ वृक्ष सार्वजनिक जागेवर वाढलेला असून त्याच्या फांद्या समोरच्या घरावर व विद्युत उद्यान वाहिनीवर आलेल्या आहेत. अपघात होऊ शकतो. करिता विभागामार्फत घराकडील झुकलेल्या फांद्या तोडण्याची शिफारस करीत आहे. उचित निर्णयास्तव सादर. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४ | श्रीमती अरुणा सुधिर बुगल रा. यशोदा नगर | अशोक<br>कडूनिंब<br>निलगिरी | १<br>१<br>१ | दि.२७/०७/२०२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता. सदर दोन्ही झाडे निलगिरी व १ कडुनिंब खुप जुनी व मोठी वाढलेली आहे. दोन्ही झाडाच्या मोठ्या फांद्या विद्युत तारावर, रस्ता व | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात | **वृक्षाच्या ७-८ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अर्जदाराच्या घरावर वाढलेल्या आहे. हवेमुळे पडू शकतात. ७ ते ८ इंच व्यासाच्या फांद्या (वरचा भाग) छाटण्याची परवानगी देण्यात हरकत नसावी. उचित निर्णयास्तव सादर. | येत आहे. | **काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५ | श्री. वनिता केशवाणी रा.आनंद विहार अम | कडूनिंब | २ | दि.२७/०७/२०२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता. दोन्ही कडूनिंब च्या फांद्या एका बाजूने रोड, विद्युत तारावर, व घराकडे वाढलेल्या आहेत. यापैकी एका झाडाची तक्रार अगोदरच आली होती. आपण परवानगी सुद्धा दिली होती. परंतु अजूनपर्यंत काहीच कार्यवाही झाली नाही. करिता २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत कापण्यात याव्यात हि शिफारस. उचित निर्णयास्तव सादर. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ६ | श्री. राजकुमार कावना रा. गायत्री नगर अम. | कडूनिंब | १ | सदर कडूनिंब वृक्षची फांद्या तोडण्याकरिता उद्यान विभागाला दि. २४/०४/२५ रोजी पत्र देण्यात आले आहे. कृपया कार्योत्तर परवानगी देण्यात यावी हि विनंती. | मा.आयुक्त – कार्योत्तर मंजुरी का घेण्यात येत आहे? अर्जदारांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर अर्ज समितीमध्ये का ठेवण्यात आलेला नाही? सहा.आयुक्त - दि.21.07.2025 ला अर्ज प्राप्त झालेला आहे. | **अर्जदाराचा अर्ज समितीसमोर का ठेवण्यात आलेला नाही याचा खुलासा सहा.आयुक्त यांनी सादर करावा.** |
| ७ | गैर अर्जदार श्री. शेख हनीफ शेख महेबूब | | | सदर प्रकरणात गैर अर्जदार श्री. शेख हनीफ शेख महेबूब यांनी त्याच्या घरातील आवारात असलेले एक कडूनिंब वृक्ष विनापरवानगी तोडल्या बाबत तक्रार प्राप्त होती. त्याबाबत त्यांना नोटीस देण्यात आली होती. दुसयांदा स्मरण पत्र दिले असता त्यांनी घेण्यास नकार दिला. तसेच अद्याप पर्यंत त्यांनी नोटीसला उत्तर दिले नाही. उचित निर्णयास्तव सादर. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **दंडाची रक्कम अर्जदाराचे मालमत्ता करामध्ये अंतर्भुत करण्यात येवुन सदर दंड वसुल करण्यात यावा** |
| ८ | गैर अर्जदार श्री. अनुज सिकची रा.ग्रीनपार्क कॉलोनी अम | | | सदर प्रकरणात गैर अर्जदार श्री. अनुज सिकची रा. ग्रीनपार्क कॉलोनी अम.यांनी त्यांच्या घराच्या आवारात एक अशोक वृक्ष त्तोडल्याची तक्रार होती. त्याबाबत त्यांना नोटीस देण्यात आली होती. त्याचा त्यांनी पुढील प्रमाणे खुलासा सादर केला आहे. सदर अशोक वृक्षाची वरची फांदी माझ्या घराच्या जिन्याकडे पूर्णपणे झुकली होती. त्या करिता झुकलेली फांदी तोडली आहे. तसेच वृक्षाच्या फांद्या तोडण्याची परवानगी घ्यावी लागते याची मला कल्पना नव्हती. माझ्या नासमज मुळे पहिली चूक समजून मला माफ करण्यात यावे हि विनंती. उचित निर्णयास्तव सादर | परवानगी न घेता झाडांच्या फांदया तोडण्यात आल्या असेल त्यांचे विरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात यावी. | **नियमानुसार अवैधवृक्ष तोड प्रकरणी ५,०००/- प्रती वृक्ष प्रमाणे दंड करण्यात यावा.** |

# झोन क्र.४

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री बाबुराव शंकरराव टेकाडे, कोंडेश्वर विद्युत कॉलोनी, साई नगर | महारुख | १ | दि. ३०/०७/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- महारुख वृक्ष लगतच्या प्लॉट मध्ये वाढलेला आहे त्याची मोठी फांदी तिरपी अर्जदाराच्या घरावर व विद्युत तारेवर वाढलेली आहे. हवेमुळे पडण्याची भीती आहे. करिता एक मोठी ८ ते १० इंच व्यासाची तिरपी फांदी तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी. अहवालानूसार वृक्ष फांदी काढण्याची मंजुरी करिता सादर. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **वृक्षाच्या ८-१० इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेली फांदी काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | अलेक्झांडर पिटर जार्ज, नवी वस्ती बडनेरा | अशोक | ४ | दि. ३०/०७/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- सदर घरामध्ये कंपाऊडच्या आत ४ अशोकाची झाडे खूप उंच व बाजूला फांद्या पसरलेल्या आहेत तरी बाजूच्या फांद्या 2 ते 4 इंच व्यासाच्या छाटण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी. अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी करिता सादर. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | विनायकराव महादेव गावंडे, महाबँक कॉलोनी,साई नगर | वड | १ | दि. ३०/०७/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- एक महाकाय वड वृक्ष रोड लगत चौकात वाढलेला आहे. अर्जदाराला विद्युत लाईन पोल वरून घ्यावयाची आहे. झाडामुळे वाहतुकीला व वियुत तारेला अडचण होत आहे. करिता वडाच्या झाडाच्या वरील घेर घरावर येणारे ४ ते ६ इंच व्यासाच्या फांद्या कापण्याची आवश्यकता आहे. विद्युत विभागाच्या समन्वयाने उद्यान विभागाकडून सदर झाडाची छाटणी करण्यात यावी.<br>अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी करिता सादर. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **वृक्षाच्या ४-६ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४ | राजेंद्र शंकरराव जाधव, सातुर्णा अमरावती | विविध प्रजातीचे | - | दि. ३०/०७/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- सदर ठिकाणी बांधकाम सुरु असून बाजूच्या प्लॉट मधील सुबाभूळ व ficus च्या झाडांच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या बांधकामात अडचण आहे. फांद्या छाटण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी.अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी करिता सादर. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या बांधकामात येणाऱ्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५ | उपविभागीय अभियंता, मजीप्रा जलव्यवस्थापन उपविभाग क्र ३ अमरावती, जुनिवस्ती बडनेरा | गुलमोहर | १ | दि. ३०/०७/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- सदर गुलमोहर वृक्ष मजीप्राच्या आवारात होता. शेजारी लहान मुलांची शाळा आहे करिता धोकादायक असल्यामुळे गुलमोहरची वाळलेली फांदी कापण्यात आलेली आहे. करिता कार्योत्तर परवानगी देण्यास हरकत नाही. अहवालानूसार वृक्षाची फांदी काढण्याची मंजुरी करिता सादर. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **वृक्षाची वाळलेली फांदी काढण्यास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | केशवराव गुल्हाने, नवाथे नगर अमरावती | स्थानिक प्रजाती चे | १ | दि. ३०/०७/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>1. तांत्रिक सदस्यांचा अहवाल सदर वृक्ष रोडच्या -: .बाजूला सार्वजनिक जागेवर वाढला आहे .जमिनीलगतची थोडी साल निघालेली आहे परंतु त्या वृक्षापासून काहीही धोका नाही.२-४ इंच व्यासाच्या फांद्या विद्युत तारेला अडथळा होणाऱ्या छाटण्याची परवानगी द्यावी. संपूर्ण वृक्ष काढण्याची परवानगी .नाकारण्यात यावी अहवालानूसार वृक्षाची फांदी काढण्याची .मंजुरी करिता सादर | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ७ | श्रीमती विमल पांडूरंगजी अंबाडकर, गणेश विहार, अमरावती | सागवान | २ | दि. ३०/०६/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- २ परिपक्क झालेली सागवान वृक्षांची झाडे साग विषयक धोरणानुसार 1:1 प्रमाणे बदली वृक्ष लागवडीची ठेव स्वीकारून परवानगी देण्यास हरकत नसावी.<br>अहवालानूसार २ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मंजुरी करिता सादर. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **नियमानुसार १:१ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

## झोन क्र.५

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती निर्मला श्रीराम जपुरकर छागाणी नगर अमरावती | कडू निंब वृक्ष | ०१ | प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता विद्युत तारेकडे झुकलेली व विद्युत ताराला स्पर्श करणारी ३ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात हरकत नसावी. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **वृक्षाच्या ३ ते ४ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | सारिका सुभाष शाहा भाजीबाजार अमरावती | उंबर वृक्ष | ०१ | प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता उंबराचे वृक्ष हे भिंत तोडून खाली पडले आहे तरी खाली पडलेले उंबर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात हरकत नसावी. | सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालनुसार मंजुर करण्यात येत आहे. | **पडलेले उंबर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

Digitally signed by
SAUMYA SHARMA CHANDAK
Date: 13-08-2025 23:27:43

**सौम्या शर्मा –चांडक(भा.प्र.से)**

**आयुक्त**

**महानगरपालिका अमरावती**